# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२ शिवाजी नगर, पुणे- ४११ ००१६

☎ :२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **E-Mail : ropune.dte@gmail.com**

---

जा.क्रं. विकापु/आस्था-१/वे.निश्चिती/विकल्प/२००९/ ९०३० दिनांक: 30 SEP 2010

प्रति,

सर्व प्राचार्य/संचालक
शासकीय व अशासकीय अनुदानित
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र व तत्सम पदवी संस्था
तंत्रनिकेतने व तत्सम पदविका संस्था

विषय:- शासकीय तसेच अशासकीय अनुदानित पदवी व पदविका अभ्यासक्रमातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत ......

संदर्भ:- १) उच्च त तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं. एसपीसी/२०१०/(३४/१०)/तांशि-२ दिनांक २० ऑगस्ट २०१०

२) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रं. ५(३)/शिक्षकीय पदे/वेनि/२०१०/३३५६५ दिनांक १७ सप्टेबर २०१०

उपरोक्त संदर्भ १ अन्वये शासकीय तसेच अशासकीय अनुदानित पदवी व पदविका अभ्यासक्रमातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार शासकीय व अनुदानित संस्थांनी केलेली वेतन निश्चितीची तपासून त्या बाबतचे प्रमाणपत्र देण्याविषयी आदेश देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने संदर्भ २ अन्वये संचालनालयातून वेतन निश्चितीच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयास व सर्व संस्थाप्रमुखांस काही सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत सदर सुचना संचालनालयाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शासन निर्णयात असलेल्या तरतुदी तसेच संचालनालयाने दिलेल्या सूचना विचारात घेऊन आपले संस्थेतील /कार्यालयातील शिक्षकांची वेतन निश्चिती करुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह तयार ठेवावी याबाबत पुढील सूचना लवकरात लवकर देण्यात येतील.

(डी.एन.शिंगाडे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत- संगणक विभाग संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी